# नियमित दिवाणी दावा क्र. ६/२०१८.

**दिलीप वि. शांताराम व इ.**

**नि. ५२ क्रमशः**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १ दिलीप कोंडाजी शिंदे यांचा पुढील सरतपास वकिल श्री. बी. एम. ठाकरे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

मी सदरील प्रकरणात पुराव्याकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **नि.क्र. ५२** लगत आहे. नि. क्रं. ३ सोबत मौजे वडनेरभैरव येथील गट क्रं. १९२३ सण २००७ ते २०१८, गट क्रं. १९२९ सण २००७ ते २०१८, गट क्रं. १९३२/१ सण २००७ ते २०१८, गट क्रं. १९३२/२ सण २००७ ते २०१८, १९३३ सण २००७ ते २०१८ चा गाव नमुना सातबारा उताराच्या प्रमाणीत प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **नि क्रं. ५३ ते ५७** देण्यात आला. वहिवाट केस क्रमांक २६/२०१६ मधील निकाल, नकाशा व पंचनामा एकत्रीत चार पाने यांना एकत्रीत **नि. क्रं. ५८** देण्यात आला. आर. टी. एस. अपिल क्रं. ३०/२०१७ दिनांक २१/१२/२०१७ आदेशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. ती **नि. क्रं. ५९** वर आहे. नि. क्रं. १७ सोबत दिनांक २२/०२/२०१८ रोजी मंडळ अधिकारी यांनी दिलेली नोटीसची प्रत दाखल केली आहे. ती **नि. क्रं. ६०** वर आहे. नि. क्रं. २८ सोबत दिवाणी दावा क्रं. ६९/२०१७ नि. क्रं. १ वर आदेशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. ती **नि. क्रं. ६१** वर आहे. नि. क्रं. ३५ सोबत पाच छायाचित्र दाखल केले आहे. त्यांना एकत्रीत **वस्तु – अ** देण्यात आला. सरतपास संपला.

**<u>प्रतिवादी क्रं. १ व ३ तर्फे श्री. एन. के. आहेर वकिल यांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.01.06 16:55:27 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**

**दि. ०६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, <u>चांदवड</u>.**